# आकाशवाणी पुणे
# प्रादेशिक वृत्त विभाग
# प्रादेशिक बातमीपत्र
# सकाळी 07 वाजून 10 मि

**दिनांक:20.09.2025** **वार:शनिवार**

---

1. नवीन उद्योग उभारणीसाठी लागणारे परवाने कमी करून वेळेची बचत करण्याचे मुख्यमंत्र्यांचे निर्देश
2. सोलापूर-मुंबई आणि सोलापूर-बंगळुरू विमान सेवा 15 ऑक्टोबरपासून सुरू होणार
3. मुख्यमंत्री लाडकी बहीण योजनेच्या लाभार्थ्यांना केवायसी प्रक्रिया पूर्ण करण्याचं आवाहन **आणि**
4. गुणवत्तापूर्ण शैक्षणिक उपक्रम राबवणाऱ्या महापालिका आणि जिल्हा परिषदांना राज्य सरकार पारितोषिकं देणार

**<u>मुख्यमंत्री</u>**

नवीन उद्योग उभारणीसाठी लागणारे परवाने कमी करून वेळेची बचत करावी, असे निर्देश मुख्यमंत्री देवेंद्र फडणवीस यांनी काल मुंबईत घेतलेल्या बैठकीत दिले. उद्योगांसाठीच्या सुधारणांची अंमलबजावणी करुन नवे उद्योग सुरू करण्यासाठी जलद आणि सुलभ परवाने देणारं राज्य असं उदाहरण देशासमोर ठेवण्याचं आवाहन त्यांनी केलं. नगरविकास विभागाने उद्योगांना लागणाऱ्या इमारत बांधकाम परवानगीसाठी कृत्रिम बुद्धिमत्तेवर आधारित ऑनलाईन यंत्रणा विकसित करावी. हरित श्रेणीत येणाऱ्या उद्योगांना ठराविक कालावधीपर्यंत पुन्हा परवाना घेण्याची वेळ येणार नाही, याची खबरदारी घ्यावी अशा सूचना त्यांनी दिल्या.

**<u>सामंजस्य करार</u>**

राज्य शासनाच्या उद्योग विभागानं स्टील महाकुंभ या कार्यक्रमात काल 9 कंपन्यांसोबत 80 हजार 962 कोटी रुपयांचे सामंजस्य करार केले. मुख्यमंत्री देवेंद्र फडणवीस, केंद्रीय मंत्री प्रल्हाद जोशी, उद्योग मंत्री डॉ. उदय सामंत यावेळी उपस्थित होते. या करारानुसार सातारा, रायगडसह गडचिरोली, चंद्रपूर, नागपूर, वर्धा आणि छत्रपती संभाजीनगर जिल्ह्यात स्टील प्रकल्प उभारले जाणार आहेत. या प्रकल्पांमुळे राज्यात 40 हजार 300 रोजगार निर्माण होण्याची अपेक्षा आहे.

**<u>सोलापूर विमान</u>**

सोलापूर विमानतळावरून येत्या 15 ऑक्टोबरपासून मुंबई आणि बंगळुरूसाठी नियमित प्रवासी विमानसेवा सुरू होणार आहे. त्यासाठीचं आरक्षण आजपासून सुरू होत आहे. केंद्रीय नागरी हवाई वाहतूक राज्यमंत्री मुरलीधर मोहोळ यांनी काल ही माहिती दिली. मुख्यमंत्री देवेंद्र फडणवीस यांच्या हस्ते या विमान सेवेचं लोकार्पण होणार आहे. नवरात्रीच्या मुहूर्तावर सोलापूरकरांना मिळणारी ही दुहेरी भेट या भागात गुंतवणूक, रोजगारनिर्मिती आणि पर्यटनाला चालना देणारी ठरेल असं मोहोळ म्हणाले.

**<u>लाडकी बहीण-केवायसी</u>**

मुख्यमंत्री लाडकी बहीण योजनेच्या लाभार्थ्यांनी केवायसी प्रक्रिया पूर्ण करावी असं आवाहन महिला आणि बाल विकास राज्यमंत्री मेघना बोर्डीकर यांनी केलं आहे. योजनेचा लाभ अधिक सुलभतेने मिळावा, ही प्रक्रिया पारदर्शक असावी यासाठी येत्या दोन महिन्यांत योजनेच्या अधिकृत संकेतस्थळाचा वापर करुन केवायसी पूर्ण करणे बंधनकारक आहे.

**<u>शिक्षण परिषद</u>**

गुणवत्तापूर्ण आणि नाविन्यपूर्ण शिक्षण उपक्रमांना चालना देण्यासाठी काम करणाऱ्या जिल्हा परिषद आणि महानगरपालिकांना प्रोत्साहनपर पारितोषिकं देण्यात येतील, अशी घोषणा शालेय शिक्षण मंत्री दादाजी भुसे यांनी केली आहे.

राज्यस्तरीय शालेय शिक्षण परिषदेचं उद्घाटन काल पुण्यात भुसे यांच्या हस्ते झालं, त्यावेळी ते बोलत होते. प्रथम क्रमांकासाठी 5 कोटी, द्वितीय क्रमांकाला 3 कोटी आणि तृतीय क्रमांकाला 2 कोटी रुपयांचं पारितोषिक देणार असल्याचं त्यांनी सांगितलं. शिक्षणामध्ये आधुनिक तंत्रज्ञानाचा वापर, पायाभूत सुविधांची उपलब्धता आणि पोषण या विषयांवर भर द्यायला हवा असं भुसे म्हणाले. पुढील शैक्षणिक वर्षापासून चौथी आणि सातवी इयत्तेसाठी शिष्यवृत्ती परीक्षा पुन्हा होणार असल्याची घोषणा त्यांनी केली.

**सेवा पर्व -जनसुरक्षा**

**सेवा आणि सुशासन या तत्त्वांचा अवलंब करत देशाच्या प्रगतीसाठी पंतप्रधान नरेंद्र मोदी यांच्या नेतृत्वातील केंद्र सरकार अथक प्रयत्न करत आहे. देशभरातल्या सर्व नागरिकांना विम्याचं सुरक्षा कवच देण्यासाठी सरकारनं केलेल्या कामाचा हा वृत्तांत....**

**विम्यासाठीचा प्रिमियम जास्त असल्यामुळं ज्या नागरिकांना विम्याचं सुरक्षा कवच घेता येत नाही त्यांनाही विम्याचा लाभ मिळावा या उद्देशानं मोदी सरकारनं 2015 मध्ये जनसुरक्षा योजना सुरू केली. यामध्ये पीएम जीवन ज्योती विमा योजना आणि पीएम सुरक्षा विमा योजनेचा समावेश आहे. अत्यंत कमी प्रिमियम भरुन लोकांना या योजनांमध्ये सहभागी होता येतं. पंतप्रधान नरेंद्र मोदी या योजनांच्या उद्घाटनप्रसंगी बोलताना म्हणाले....**

**हम चाहते है, की देश के सामान्य व्यक्ति के जीवन में क्योंकि संकट अमीरों को नही आता है, ये संकट गरीब को आता है आम तौर पे आपको मालूम है, आप इन्शुरन्स निकालने जाए तो, पता नहीं कितने डॉक्टर आपको चेक करते हैं, कितना मेडिकल चेक और वो तय करता है, इसको दे या न पता नही ये लुढक जायेगा तो, ये स्कीम ऐसी है आपको सिर्फ फॉर्म भरना है अगर आप बीमार होंगे तो भी इसको मिल सकता है**

**आयुर्विम्याबरोबरच उपचारांवरील विमा सुरक्षेसाठी केंद्र सरकारनं प्रधान मंत्री जन आरोग्य योजना सुरू केली. या योजनेअंतर्गत प्रत्येक कुटुंबाला सरकारी तसंच विशिष्ट खाजगी रुग्णालयांमधील उपचारांसाठी पाच लाख रुपयांपर्यंतचं विमा संरक्षण दिलं जातं.**

**भारतातल्या गरीब लोकांची स्वप्नं पूर्ण होण्यातला सगळ्यात मोठा अडसर म्हणजे अनिश्चितता. तो दूर करण्यासाठीच केंद्र सरकार सातत्यानं प्रयत्न करत आहे. सर्वसामान्य नागरिकांना परवडणाऱ्या दरात विमा उपलब्ध करुन देऊन सरकारनं त्यांची स्वप्नं आणि भविष्य सुरक्षित केलं आहे.**

**जीएसटी बैठक**

ट्रॅक्टर आणि शेतीसाठीच्या इतर साधनांवरच्या कमी केलेल्या जीएसटीचा लाभ थेट शेतकऱ्यांपर्यंत पोहोचला पाहिजे अशा सूचना केंद्रिय कृषी मंत्री शिवराज सिंग चौहान यांनी दिल्या. शेतीच्या अवजारांची निर्मिती करणाऱ्या कंपन्यांच्या प्रतिनिधींसमवेत काल नवी दिल्लीत घेतलेल्या बैठकीत ते बोलत होते. दरकपातीचा फायदा मध्यस्थांच्या खिशात न जाता थेट शेतकऱ्यांना मिळाला पाहिजे आणि याचा प्रभाव येत्या 22 तारखेपासूनच दिसायला हवा असं चौहान यांनी स्पष्टपणे सांगितलं.

**जीएसटी प्रतिक्रिया**

केंद्र सरकारनं वस्तू आणि सेवा कर कमी केल्यामुळे चारचाकी वाहनं खरेदी करणं तसंच त्याची देखभाल दुरुस्ती आणि वाहनविम्यावरचा खर्चही कमी होणार आहे. चारचाकी गाडी खरेदी करू इच्छिणाऱ्या सर्वांना फायदा होईल असं सांगताना पुण्यातील सनदी लेखापाल अमेय ढेरे म्हणाले.....

**आधी लहान कारवरती अठ्ठावीस टक्के जीएसटी आणि वेगवेगळे सेस लागायचे आता त्या कारवरती फक्त 18 टक्के जीएसटी राहणार आहे, त्यामुळे लहान कार स्वस्त होणं अपेक्षित आहे आता फक्त गाड्यांच्याच किंमती कमी होणार**

**आहेत असं नाही तर मेंटेनन्स चा खर्चही कमी होणं अपेक्षित आहे. कारण या सर्व गाड्यांच्या स्पेअर पार्ट्सचा रेट आता अठरा टक्क्यांवरती आलेला आहे, त्यामुळे ब्रेक्स, फिल्टर्स, टायर्स असे वेगवेगळे पार्ट हे आता स्वस्त दरात आपल्याला उपलब्ध होणार आहेत अजून एक ह्याचा फायदा असा आहे की गाडीची बेसिक किंमतच कमी झाल्यामुळं गाडीच्या इन्शुरन्सचं प्रीमियम हे कमी होणार आहे. याचा अर्थ असा की गाडी खरेदी करणं गाडीचा इन्शुरन्स करणं गाडीचा मेंटेनन्स करणं हे आता बऱ्याच अंशी स्वस्त होणं अपेक्षित आहे.**

**पुरस्कार-नाशिक**

नाशिकमधल्या यशवंतराव चव्हाण महाराष्ट्र मुक्त विद्यापीठातर्फे दिला जाणारा कुसुमाग्रज राष्ट्रीय साहित्य पुरस्कार, प्रसिद्ध हिंदी कवी कुमार अंबुज यांना जाहीर करण्यात आला आहे. मुक्त विद्यापीठाच्या कुसुमाग्रज अध्यासनामार्फत 2010 पासून दरवर्षी एका निवडक अ-मराठी कवीला हा पुरस्कार दिला जातो.

**संगीत पुरस्कार**

पुण्यातील स्वरानंद प्रतिष्ठानच्या वतीनं संगीत क्षेत्रातल्या कामगिरीसाठी देण्यात येणारे यंदाचे पुरस्कार जाहीर झाले आहेत. केशवराव भोळे पुरस्कारासाठी संगीतकार आशुतोष कुलकर्णी यांची तर माणिक वर्मा पुरस्कारासाठी गायिका अस्मिता चिंचाळकर यांची निवड झाली आहे. संतूरवादक शंतनू गोखले आणि गायिका स्वरदा गोडबोले यांनाही पुरस्कारानं सन्मानित करण्यात येणार आहे.

**सेवा पंधरवडा**

जळगांवमध्ये सेवा पंधरवड्यानिमित्त शहरातल्या स्मशानभूमीत स्वच्छता अभियान राबवण्यात आलं. सिंधुदुर्ग जिल्ह्यात सेवा पंधरवड्यानिमित्त शाळा तिथं दाखला उपक्रम राबवला जात आहे. सांगली जिल्ह्यात सार्वजनिक आरोग्य विभागानं सेवा पंधरवड्यात 75 बालकांवर मोफत हृदय शस्त्रक्रिया करण्याचा संकल्प केला आहे. त्यातील 31 मुलं काल शस्त्रक्रियेसाठी मुंबईला रवाना झाली.

**डॉ हेमा साने-निधन**

ज्येष्ठ वनस्पती शास्त्रज्ञ डॉ. हेमा साने यांचं काल पुण्यात निधन झालं. त्या 85 वर्षांच्या होत्या. निसर्गाशी एकरूप होऊन राहण्याची जीवनशैली त्यांनी आयुष्यभर सांभाळली. पुण्यातील आबासाहेब गरवारे महाविद्यालयातून त्या वनस्पतीशास्त्र विभागाच्या प्रमुख म्हणून सेवानिवृत्त झाल्या होत्या. त्यांनी इतिहास, प्राच्यविद्या अशा विविध विषयांवर मिळून तीसहून अधिक पुस्तके लिहिली आहेत.

**क्रिकेट**

आशिया करंडक क्रिकेट स्पर्धेत काल अबुधाबी इथं झालेल्या अ गटातील अंतिम साखळी सामन्यात भारतीय संघानं ओमानचा 21 धावांनी पराभव केला. भारतानं ओमानपुढं विजयासाठी 20 षटकांत 189 धावांचं लक्ष्य ठेवलं होतं. ओमानचा संघ 4 गड्यांच्या बदल्यात केवळ 167 धावा करू शकला. ओमानच्या आमीर कलीम या अष्टपैलू खेळाडून 46 चेंडूंमध्ये 64 धावा केल्या. या स्पर्धेत भारतानं यापूर्वी जिंकलेल्या दोन सामन्यांसाठी चार गुण मिळवून अगोदरच सुपर 4 मध्ये पोहोचला आहे. तर ओमानचा संघ स्पर्धेतून बाहेर गेला आहे.

**हवामान**

कोकण आणि विदर्भात आज बऱ्याच ठिकाणी पावसाची शक्यता आहे. मध्य महाराष्ट्र आणि मराठवाड्यात काही ठिकाणी पाऊस पडेल असा हवामान विभागाचा अंदाज आहे.

## आकाशवाणी पुणे केंद्राचं प्रादेशिक बातमीपत्र संपलं. नमस्कार.